सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रो. (डॉ.) सदानंद भोसले
एम्.ए., पीएच् डी.
**संचालक** (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१


संदर्भ : रासेयो/२०२५–२६/११५ दि. ०७/०७/२०२५

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय : मूल्यशिक्षण उपक्रमांतर्गत गुरूपौर्णिमेचे आयोजन करण्याबाबत...

महोदय,

राष्ट्र उभारणीमध्ये गुरूजनांचे योगदान सर्वोपरी आहे. भारतीय शिक्षण परंपरेमध्ये ज्ञानाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये बालवर्गापासून सर्वोच्च पदवी पीएच्.डी. चे शिक्षण अर्जनाच्या प्रक्रियेत गुरूंचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. गुरू हे ज्ञान आणि प्रेरणेचे अखंड स्त्रोत आहेत. गुरूंच्या प्रती नतमस्तक होणे ज्ञान साधना प्रक्रियेचा स्वाभाविक भाग आहे म्हणून गुरूपौर्णिमेच्या दिवशी आपण आपल्या गुरूंचे वंदन करतो. गुरूपौर्णिमेला भारतीय ज्ञान साधना परंपरेमध्ये महर्षि व्यासांच्या ज्ञानात्मक व्यक्तिमत्वाला वंदन करून आपल्या गुरूजनांचे वंदन केले जाते आणि ज्ञान साधनेचा स्त्रोत अखंड प्रवाहित होत जातो.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने मूल्यशिक्षण उपक्रमांतर्गत आणि 'गुरूपौर्णिमेचे' औचित्य साधून दि. १० ते १४ जुलै २०२५ दरम्यान 'गुरूपौर्णिमा' उपक्रम राबविण्यात यावा. यामध्ये आपल्या महाविद्यालयातील रासेयो आणि अन्य विद्यार्थ्यांनी आपल्या गुरूजींचे वंदन करावे. रासेयो कार्यक्रम अधिकारी यांनी 'गुरूपौर्णिमा आणि महर्षि व्यास' या विषयावर विद्यार्थ्यांना वैचारिक अभिव्यक्तिसाठी व्यासपीठ निर्माण करून द्यावे. 'गुरूपौर्णिमा आणि महर्षि व्यास' या विषयावर 'निबंध लेखन' आणि 'वक्तृत्व' स्पर्धांचे आयोजन करावे. तसेच सर्वोत्कृष्ट निबंधांचे रासेयो विभागाच्यावतीने पुस्तकरूपाने प्रकाशन केले जाईल. तरी उपक्रमामध्ये सहभागी विद्यार्थ्यांचा व राबवलेल्या उपक्रमांचा अहवाल रासेयो कार्यालयास https://forms.gle/oYKrN8aH8pnwofvh6 या गुगल लिंकद्वारे दि. १५ जुलै २०२५ पर्यंत भरणे बंधनकारक आहे. तसेच सहभागी विद्यार्थ्यांच्या निंबधाची प्रत तात्काळ रासेयो कार्यालय याठिकाणी जमा करण्यात याव्यात. सदर उपक्रम आयोजन खर्च रासेयो नियमित कार्यक्रमातून करण्यात यावा. कळावे, ही विंनती.

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना